लोकसत्ता पु.पा.३ व ४.

# ४१ इमारतींमधील रहिवाशांचा मोर्चा

## पुनर्वसनाबाबत महापालिका राज्य शासनाचे मार्गदर्शन घेणार



**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** नालासोपारामधील ४१ अनधिकृत इमारतींमधील रहिवाशांनी मंगळवारी आगरी सेनेच्या नेतृत्वाखाली पालिकेवर मोर्चा काढला. यावेळी रहिवाशांच्या पुनर्वसनासंदर्भात चर्चा करण्यात आली. याबाबत राज्य शासनाकडून मार्गदर्शन घेण्यात येईल, अशी माहिती पालिकेने चर्चेदरम्यान शिष्टमंडळाला दिली.

नालासोपारा पूर्वेच्या अग्रवाल नगरी येथे कचराभूमी (डंपिंग ग्राऊंड) आणि सांडपाणी प्रकल्पासाठी (एसटीपी) आरक्षित जागेवर तसेच खासगी जागा बळकावून ४१ अनधिकृत इमारती बांधण्यात आल्या आहेत. या इमारतींवर कारवाई करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिल्यानंतर रहिवाशी इमारती वाचविण्यासाठी आगरी सेनेच्यामार्फत लढा देत होते. या निर्णयाविरोधात रहिवाशांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सर्वोच्च न्यायालयाने देखील या इमारती बेकायदा ठरवल्या. मात्र या रहिवशांच्या पुनर्वसनाची गरज व्यक्त केली. शासकीय योजनांमार्फत या रहिवाशांचे पुनर्वसन शक्य असल्यास त्यावर विचार करण्याचा शासनाला विनंती करता येईल असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले होते.

त्यानुसार मंगळवारी (पान ४ वर)

### कारवाई आणि भूसंपादन

४१ इमारतींमधील काही इमारती या अतिधोकादायक (सी-१) वर्गात आहेत तर काही इमारती या रिकाम्या आहेत. त्यावर निष्कासनाची कारवाई केली जाणार आहे. पालिकेला कारवाई आणि प्रकल्पासाठी भूसंपादन अशा दोन्ही प्रक्रिया कराव्या लागणार आहे. अनेक जागांचे टायटल क्लिअर नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे जागांचे विकास हस्तांतरण शुल्कही देण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत.

# ४१ इमारतींमधील रहिवाशांचा मोर्चा

**(पान ३ वरून)** दुपारी आगरी सेनेच्या वतीने या इमारतींमधील हजारो रहिवांशांनी पालिकेवर मोर्चा काढला होता. रहिवाशांचे याच जागेवर पुनर्वसन करण्यात यावे आणि ते शक्य आहे, असे आगरी सेनेचे अध्यक्ष कैलास पाटील यांनी सांगितले. या मुद्द्यवर पालिका आयुक्त अनिलकुमार पवार, खासदार डॉ. हेमंत सवरा, आगरी सेना आणि रहिवाशांच्या शिष्टमंडळासह चर्चा झाली. पुनर्वसन करण्याच्या विविध पर्यायांची माहिती यावेळी शिष्टमंडळाच्या वतीने देण्यात आली. ज्या प्रमाणे सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहे. त्यानुसार आम्ही राज्य शासनाकडे पुनर्वसनासंदर्भात मार्गदर्शन मागवणार आहोत, अशी माहिती पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी दिली. सर्वोच्च न्यालायचाच्या निर्णयाप्रमाणे आम्ही टप्प्याटप्प्याने प्रक्रिया पूर्ण करू, असेही आयुक्तांनी सांगितले.

लोकसत्ता पु.पा.२.

# टेम्पोच्या धडकेत चिमुकलीचा मृत्यू

**वसई :** भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनाने धडक दिल्याने दोन वर्षीय रिया सिंगचा मृत्यू झाला. विरार पश्चिमेच्या डोंगपाडा येथे सोमवारी दुपारी हा अपघात घडला

रिया सिंग विरार पश्चिमेच्या डोंगपाडा येथील जीवदानी दर्शन इमारतीत रहात होती. तिचे वडील सुरक्षारक्षकाचे काम करतात. सुमारास रिया आपल्या घराजवळ रस्त्याच्या कडेला खेळत होती. आत्माराम पार्क या इमारतीसमोर भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनाने तिला धडक दिली. विरार पोलिसांनी चालक सिपीन शहा (२२) याला बेदरकारपणे वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

पुढारी पा.नं.१०

# मिरा-भाईंदरमध्ये डान्सबारवर कारवाई

## १३ बारबाला, १३ इतर आरोपींना केली अटक

**मीरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मीरा भाईंदरमध्ये काशीमिरा येथील एका बारमधील मुली डान्स करत असल्याचा व्हीडिओ समाज माध्यमावर व्हायरल झाल्यानंतर अनैतिक मानवी वाहतूक शाखेच्या पोलिसांनी या बारवर धाड टाकत १३ डान्सर मुलींसह १३ आरोपींना अटक करत ३५ हजार ५०० रुपये जप्त केले आहे. या कारवाईत चालक मालक यांना फरार असल्याचे समजते.

लॉकडाऊन काळात नियमांचे उल्लंघन करत रात्रभर डान्स बारमध्ये डान्स सुरू असल्याचे आढळून आल्यामुळे काशीमिरा पोलिसांनी कारवाई करत २१ जणांना अटक केले होती. हा ऑर्केस्ट्रा बार बेकायदा असल्यामुळे तत्कालीन पालिका आयुक्त व पोलीस आयुक्तांच्या आदेशानुसार जमीनदोस्त करण्यात आला होता. मात्र पुन्हा सहायक आयुक्तांनी दुरुस्ती परवानगी दिल्यामुळे पुन्हा त्या बारचे बांधकाम करण्यात आले असून यामध्ये पुन्हा डान्सबार सुरू केला आहे.

**गुन्हा दाखल**

रात्रीच्या वेळ असल्याने १३ मुलींना मंगळवारी सकाळी काशिमिरा पोलीस ठाणे येथे हजर राहण्याची समज देऊन सोडून देण्यात आले आहे. याबाबत ताब्यात घेतलेले आणि पाहिजे आरोपी चालक, मालक आणि तपासात निष्पन्न होणारे इतर आरोपी यांच्या विरोधात विविध कलमाअंतर्गत काशिमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

या डान्स बारमध्ये सोमवारी रात्री १२ वाजता छापा टाकला. त्यावेळी ऑर्केस्ट्रा बारचे चालक, मालक, कॅशिअर, मॅनेजर, स्टिवर्ड, वेटर, वादक व पुरुष सिंगर यांनी आपआपसात संगनमत करून ग्राहकांना प्रोत्साहित करण्यासाठी १३ मुली या तोकडे अश्लिल नृत्य करत असताना यावेळी आढळून आल्या.

दरम्यान शासनाने मंजूर केलेल्या परवान्याचे उल्लंघन करून नियमापेक्षा जास्त मुली सिंगर कम डान्सर या बारमध्ये ठेवण्यात आल्या होत्या.

त्यामुळे ऑर्केस्ट्रा बारचे दोन मॅनेजर, एक कॅशिअर, चार स्टिवर्ड, तीन वेटर, दोन वादक, एक पुरुष सिंगर आणि १३ महिला सिंगर कम डान्सर असे एकूण २६ जण व ३५ हजार ५०० रुपये मुद्देमालासह ताब्यात घेत अटक केली आहे.

# ऑनलाईन फसवणुकीतील ३० लाख मिळाले परत

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा भाईंदरमध्ये ऑनलाईन फसवणूक करण्यात आलेल्या दोघाजणांचे ३० लाख रुपये सायबर पोलिसांनी तपास करून परत मिळवून दिले आहेत.

मिरा भाईंदर पोलीस आयुक्तालय हद्दीतील भाईंदर व मिरा रोड येथे राहणाऱ्या दोघांची ऑनलाईन फसवणूक करण्यात आली होती. या प्रकरणाचा सायबर पोलिसांनी तपास करून फसवणूक झालेल्या दोघांना ३० लाख रुपये परत मिळवून दिले आहेत.

भाईंदर पोलीस ठाणे हद्दीत राहणारे तक्रारदार संघवी यांनी फेसबुकवर शेअर ट्रेडिंग करून अधिक नफा मिळविण्याबाबत जाहिरात पाहिली. जाहिरातीमध्ये दिलेल्या व्हॉटसॲप ग्रुपमध्ये मॅसेज करून तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक ॲड केला. त्यानंतर नफा मिळविण्याच्या उद्देशाने पैशांची गुंतवणूक केली. तक्रारदार यांनी नफा मिळविलेली रक्कम काढण्याचा प्रयत्न केला असता त्यांना रक्कम काढता येत नसल्याचे लक्षात आल्याने आर्थिक फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानुसार तक्रारदार यांनी सायबर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारी अर्जानुसार फसवणुकीबाबत भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानुसार तक्रारदार यांच्या व्यवहाराचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची रक्कम वेगवेगळ्या खात्यांमध्ये वर्ग झाल्याची माहिती प्राप्त झाली. त्या अनुषंगाने तक्रारदार यांची रक्कम वर्ग झालेले खाते तत्काळ गोठविण्यासाठी संबंधीत बँकेंना पत्रव्यवहार करण्यात आले. सायबर पोलीस ठाणे यांच्याकडून वारंवार पाठपुरावा केल्याने तक्रारदार यांची फसवणूक झालेल्या रक्कमेपैकी २१,९३,२७९ रुपये मूळ खात्यात परत मिळवून देण्यात आले आहे.

दुसऱ्या फसवणूक झालेल्या गुन्ह्यात तक्रारदार दळवी हे मिरारोड पोलीस ठाणे हद्दीत राहत असून त्यांनी ॲपमध्ये गुंतवणूक करून अधिक नफा मिळत असल्याबाबतची जाहिरात पाहिली. सदर ॲपची पडताळणी न करता तक्रारदार यांनी ३५,५५,२३६ रुपयांची गुंतवणूक केली. परंतु त्यानंतर तक्रारदार यांना कोणताही परतावा न मिळाल्याने त्यांची आर्थिक फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्याबाबत तक्रारदार यांनी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानुसार बँकेबरोबर व न्यायालय यांच्याकडे पाठपुरावा करून तक्रारदार यांना फसवणूक झालेल्या रक्कमेपैकी ८,३०,८८२ रुपये मूळ खात्यात परत मिळवून देण्यात आले आहेत. अशा प्रकारे दोन्ही दाखल गुन्ह्यातील ३० लाख ४१ हजार १६१ रुपये तक्रारदार यांना सायबर पोलीसांनी परत मिळवून दिले आहेत.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पु. पा. ४.


'अन्न व औषध' प्रशासनाचे परवाने आवश्यक

# हायवेवर जेवढे थांबे तेवढेच ढाबे; परवाने कोणाकडे?

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मुंबई-अहमदाबाद महामार्ग हा मुंबई आणि गुजरात या राज्यांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. या महामार्गावर गेल्या काही काळात हॉटेल व ढाब्यांची संख्या वाढली आहे.

वीकेंडच्या नावाखाली किंवा प्रवास करताना विश्रांती किंवा जेवण करण्यासाठी या हॉटेलमध्ये किंवा ढाब्यामध्ये जाऊन जेवण करण्याकडे अनेकांचा कल दिसून येत आहे. त्यामुळे अनेकजण मुख्य मार्गावर हॉटेल तसेच ढाबे नव्याने सुरू करताना दिसत आहेत. परंतु या हॉटेल व ढाबेवाल्यांनी अन्न, औषध विभागाकडून संबंधित परवाने घेतले आहेत का, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहे.



## तपासणीसाठी अधिकारी आहेत की नाही?

२५ लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या वसई तालुक्यात हजारो हॉटेल, रेस्टॉरंट, खाद्यपदार्थ विक्री करणारी दुकाने आहेत. या आस्थापनांतून विक्री होणाऱ्या अन्नपदार्थांची तपासणीसाठी अन्न-औषध प्रशासनाकडे अधिकारी आहेत की नाही? असा प्रश्न समस्त वसईकरांना पडला आहे. अन्न सुरक्षा तपासणीसाठी पुरेसे अधिकारी नसल्यामुळे नागरिकांनी खरेदी केलेल्या अन्नपदार्थांची सुरक्षा देखील वाऱ्यावरच आहे.

## दोनशेपेक्षा जास्त ढाबे

मुंबई-अहमदाबाद महामार्ग मुंबई आणि गुजरातला जोडणारा मुख्य मार्ग आहे. या महामार्गावरून दररोज लाखो वाहने ये-जा करतात. या राष्ट्रीय महामार्गावर दोनशेपेक्षा जास्त ढाबे आहेत. याच महामार्गाच्या कडेला असलेल्या ढाब्यांमधून दारूची विक्री होत असल्याचे दिसून येते.

## परवानगीसाठी कोणाची आवश्यकता?

ग्रामीण हद्दीत हे ढाबे येत असल्यास ग्रामपंचायतीची परवानगी, ढाब्यासाठी एफएसएसएआय नोंदणी, तसेच अन्न व औषध विभागाचा परवाना ढाब्यासाठी आवश्यक आहे. तसेच परवाना रिनिव्हल करणेही गरजेचे असते.

## ढाबाचालकांवर कारवाई करणार कोण?

महामार्गावरील अनेक ढाब्यांवर रात्रीच्या वेळी दारूची विक्री लपूनछपून केली जाते, तर काही ठिकाणी बसून दारू पिण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात येते. पण याकडे राज्य उत्पादन शुल्क विभाग काणाडोळा करतात. या ढाब्यांवर

## एकही कारवाई नाही

वसईत अन्न व औषध प्रशासनाचे कार्यालय नाही. अधिकारी आहेत याची माहिती कोणाला नाही. वसई तालुक्यातील हॉटेल, ढाबे यांकडे अन्न व औषध प्रशासनाने काणाडोळा केला असल्याने भेसळ करणाऱ्यांचे फावले आहे. आजपर्यंत हॉटेल, रेस्टॉरंट, ढाबे यांची तपासणी करून दोषी आढळल्यास कारवाई झाल्याचे ऐकिवात नाही.

## परवान्यांबाबत माहितीच नाही

महामार्गावरील ढाब्यांवर पाहणी करताना माहिती घेतली असता परवान्यांबाबत माहिती नसल्याचे उत्तर देण्यात आले. मनपा हद्दीतील ढाब्यांसाठी परवाने घेतल्याचे ढाबामालकांनी सांगितले.

पुढारी पा. नं. १०


# फाऊंटन-गायमुख दरम्यानच्या रस्ता रुंदीकरणास शासनाची मंजुरी

## दोन वर्षांत रस्ता रुंदीकरण होणार पूर्ण; वाहतूककोंडी सुटणार

भाईंदर : पुढारी वृत्तसेवा

मिरा-भाईंदर महापालिकेच्या मंजूर व प्रारूप विकास योजनेतील फाऊंटन ते गायमुख या ३० मीटर रुंद रस्त्याचे ६० मीटर रुंदीकरण करण्यास राज्य शासनाने ७ ऑक्टोबर रोजी मंजुरी दिली. यामुळे या रस्त्याच्या निविदा प्रक्रियेचा मार्ग मोकळा झाला आहे. तर रस्ता रुंदीकरणाच्या कामाला आगामी विधानसभा निवडणुकीनंतर सुरुवात केली जाणार असून हे काम २ वर्षांत पूर्ण करण्यात येणार आहे.

घोडबंदर रोड या राज्य महामार्गावर दररोज हजारो वाहने ये-जा करीत असतात. त्यात अवजड वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. अशातच हा रस्ता काही ठिकाणी ३० मीटर तर काही ठिकाणी २० मीटर किंवा त्यापेक्षा कमी रुंदीचा असल्याने या महामार्गावर मोठ्याप्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. त्यातही एखादे वाहन बंद पडल्यास अथवा ते तीव्र वळणाच्या ठिकाणी अपघातग्रस्त झाल्यास वाहतूक कोंडीत मोठी भर पडून एकाच ठिकाणी वाहने तासन्तास अडकून पडतात. ही नित्याची वाहतूक कोंडी निकाली काढण्यासाठी आ. प्रताप सरनाईक यांनी मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्रातील फाऊंटन हॉटेल ते गायमुख पर्यंतच्या रस्त्याचे सरसकट ६० मीटर रुंदीकरण करण्याची मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली होती. मुख्यमंत्र्यांनी त्याला जुलै महिन्यात मान्यता दिली. त्याचा प्रस्ताव नगरविकास विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला असता विभागाने त्याला ७ ऑक्टोबर रोजी मान्यता दिली.



## काम युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे आदेश

फाऊंटन हॉटेल ते गायमुखपर्यंतच्या सुमारे साडेचार किलोमीटर पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण होणार असून त्यापुढील गायमुख ते कापूरबावडी पर्यंतच्या सुमारे १४.९० किमी रस्त्याचे देखील ६० मीटर रुंदीकरण करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. मात्र हा रस्ता संजय गांधी राष्ट्रीय उद्यानालगत असल्याने त्याच्या रुंदीकरणाच्या कामासाठी वनविभागाची परवानगी अत्यावश्यक ठरणार आहे. तसा प्रस्ताव पीडब्ल्यूडी विभागाने वनविभागाकडे यापूर्वीच पाठविला असला तरी वनविभागाकडून अद्याप परवानगी देण्यात आली नसल्याचे समजते. याच महामार्गावरून गायमुख ते दहिसर चेकनाका दरम्यान मेट्रो मार्ग प्रस्तावित असून त्याचे काम वेळेत पूर्ण करण्यासाठी रस्ता रुंदीकरणाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे आदेश शासनाकडून एमएमआरडीएला देण्यात आला आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पु.पा.३.

# वसईतील रस्ते हरवले धुळीत

## नाकातोंडात जाते धूळ : वाहनचालकांचे आरोग्य धोक्यात

लोकमत न्यूज नेटवर्क

**पारोळ :** वसई तालुक्याच्या अनेक भागांतील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात धूळ पसरलेली दिसते. या रस्त्यांवरून दिवसभर वाहतूक सुरू असते. मात्र हे रस्तेच गेल्या काही दिवसांपासून धुळीत हरवले असल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना धुळीचा सामना करावा लागत आहे. परिणामी या वाहनचालकांना अपघाताची भीती असून, या मार्गावरून प्रवासाद्वारे त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

मुंबई-अहमदाबाद महामार्गासह वसईच्या अनेक रस्त्यांवर पावसात मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते. हे खड्डे भरण्यासाठी मोठ्या प्रमाणात माती, सिमेंटचा वापर केला होता. मात्र आता पाऊस थांबल्याने पुन्हा एकदा अवजड वाहतुकीमुळे रस्त्यांची झीज होऊन माती, धूळ उडत आहे.

### डोळ्यात धूळ, नजरेत बाधा, अपघाताची भीती

रस्त्यांची अक्षरश: धूळधाण झाली आहे. वाऱ्यामुळे दूरवर पसरणाऱ्या या धुळीचा त्रास प्रामुख्याने दुचाकीचालकांना सहन करावा लागत आहे. त्यांच्या नाकातोंडात धूळ जाऊन नागरिकांना घशाचे व सर्दी-खोकल्याचे तसेच श्वसनाचा त्रास होऊ लागले आहेत. अनेकदा ही धूळ वाहनचालकांच्या डोळ्यांत जाऊन नजरेतही अडथळा निर्माण होतो, परिणामी अपघात होण्याचा धोका असतो. पालिकेच्या बांधकाम विभागाने हे खड्डे थातूरमातून पद्धतीने बुझविल्याने नागरिकांना, तसेच वाहनचालकांना याच त्रास होत आहे. तसेच धुळीचे कण उडून परिसरातील दुकानांत तसेच हॉटेलमध्ये पसरतात. उघड्यावरील अन्नपदार्थ, तसेच दुकानदारांनी विक्रीसाठी ठेवलेल्या साहित्यावर धूळ साचून राहत आहे.



पाऊस थांबताच वसई तालुक्यातील अनेक रस्त्यांवर धुळीचे साम्राज्य पसरलेले दिसते आहे. यामुळे वाहनचालकांसह नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. (छाया : सुनील घरत)

### डांबरीकरण करण्याची मागणी

वसईच्या अनेक भागांतून अवजड वाहनांचीये-जा सुरू असते. या अवजड वाहनांमुळे भरलेल्या खड्ड्यांतील माती उडते. या धुळी कणांचा नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊ लागला आहे. अनेक दुचाकी चालक तर हेलमेट असतानादेखील या धुळीकणांमुळे त्रस्त आहेत. माती, खडीने धूळधाण झालेल्या रस्त्यांवर पालिकेने तत्काळ डांबरीकरण करून वाहनचालकांना दिलासा द्यावा, अशी मागणी वाहनचालकांकडून होत आहे.

## लाइव्ह व्हिडीओ बनवत पोलिसाने घेतला गळफास

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोडमध्ये नव्याने भरती झालेल्या २३ वर्षीय पोलिस शिपायाने पंख्याला गळफास लावून आत्महत्या केली आहे. सागर सगोंडा अथनीकर (मूळ रा. बेळुंखी, ता. जत, जि. सांगली) असे आत्महत्या करणाऱ्या पोलिस शिपायाचे नाव आहे. स्वतःच्या आत्महत्येचा त्याने लाइव्ह व्हिडीओ बनविला होता.

अपना घर गृहसंकुलात सागर हा अन्य एका पोलिसासह भाड्याने राहत होता. सहकारी पोलिस मित्र हा सागर झोपलेल्या खोलीत रविवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास गेला असता, सागर पंख्याला गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसला. सागर याने त्याचा मोबाइल खिडकीला लावला होता व त्याने आत्महत्या करतानाचे व्हिडीओ शूटिंग त्यात केले होते. मी जीवनाला कंटाळलो असून, माझी कोणाच्या विरोधात काहीही तक्रार नाही, असे त्यात सागर याने म्हटले होते.

Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी पु.पा.८

# कत्तलखान्यासाठी काढलेली निविदा अखेर रद्द

## आजी-माजी आमदारांमध्ये तू तू-मैं मैं

**मीरा रोड** : मीरा भाईंदर शहरात कत्तलखाना उभारण्यासाठी महापालिकेने कंत्राट देण्यासाठी निविदा काढली. निविदा काढताच माजी आ. नरेंद्र मेहता व आ. गीता जैन यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू झाले. कत्तलखान्याची आवश्यकता नसल्याचे सांगत काढलेली निविदा रद्द करावी, अन्यथा आंदोलन करू, असा इशारा मेहता यांनी दिला. कत्तलखान्याचे काम आ. जैन यांच्या सहमतीने होत असल्याचा आरोप केला. यावरून मीरा-भाईंदरमध्ये कत्तलखान्यावरून राजकारण चांगलेच तापले आहे. सोमवारी आ. जैन यांनी आयुक्तांची भेट घेऊन कत्तलखान्याची निविदा प्रक्रिया रद्द करण्याची मागणी केली. नंतर महापालिकेने ही निविदा प्रक्रिया रद्द केली असल्याचे सांगितले.

भाईंदर पश्चिमेच्या उत्तन येथील सर्व्हे. क्र. ३५२ (अ) च्या जागेत कत्तलखाना उभारण्यासाठी ४० कोटींची निविदा महापालिकेने ३ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध केली. कत्तलखान्यासाठी राज्य सरकारच्या नगरविकास विभागाकडून मूलभूत सोयीसुविधा योजनेंतर्गत ५० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. निधीतून हे काम केले जाणार आहे.

निविदा प्रसिद्ध झाल्याची माहिती मिळताच हिंदू संघटना व भाजपचे रवि व्यास, माजी आ. नरेंद्र मेहता यांनी तीव्र विरोध केला आहे. मीरा भाईंदर शहरातील नागरिकांना कत्तलखान्याची आवश्यकता नाही. जिथे कत्तलखाना उभारला जाणार आहे, तेथील नागरिकांचा याला विरोध आहे. यामुळे कत्तलखान्याचे कंत्राट १० ऑक्टोबरपूर्वी रद्द करण्याची मागणी मेहता यांनी केली. हे काम आ. गीता जैन यांच्या मतदारसंघात होत आहे. यामुळे प्रशासनाने त्यांना विश्वासात घेऊन निविदा प्रक्रिया राबवली असल्याचा दावा केला आहे. मुख्यालयात गीता जैन यांनी सोमवारी आयुक्तांसोबत बैठक घेतली. यावेळी हिंदू समर्थक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. शहराच्या आणि येथील नागरिकांच्या हितात नसलेला हा कत्तलखाना रद्द करण्याबाबत आवाज उठवण्यात आला. दुपारनंतर शहर अभियंत्यांनी कत्तलखान्याचा हा निर्णय रद्द करण्यात आल्याचे सांगितले.

लोकमत पु.पा.३.

जात आहे.



अग्रवाल परिसरातील ४१ इमारतींच्या रहिवाशांनी मंगळवारी दुपारी वसई-विरार मनपाच्या मुख्य कार्यालयावर मोठा मोर्चा काढला होता.

# ४१ इमारतींतील रहिवासी धडकले महापालिकेवर

## घराच्या बदल्यात घर देण्याची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : सर्वोच्च न्यायालयाने बेकायदेशीर ठरविलेल्या नालासोपारा अग्रवाल परिसरातील ४१ इमारतींच्या रहिवाशांनी आगरी सेनेसह मंगळवारी दुपारी ३ वाजता वसई-विरार मनपाच्या मुख्य कार्यालयावर मोर्चा काढून आक्रोश व्यक्त केला. आपल्याला बेघर करू नये, घराच्या बदल्यात घर द्यावे, ही मागणी त्यांनी यावेळी केली.

अग्रवाल नगरी येथे डंपिंग ग्राउंड आणि सांडपाणी प्रकल्पासाठी भूखंड आरक्षित आहे. २००६ मध्ये ही जमीन माजी नगरसेवक सीताराम गुप्ता व अरुण गुप्ता यांनी बळकावून, २०१० ते २०१२ या कालावधीत अनधिकृत इमारती बांधून घरेबोगस कागदपत्राच्या आधारे रहिवाशांना विकली होती.

### पोलिसांचा बंदोबस्त

- न्यायालयाने या सर्व इमारती बेकायदेशीर ठरविल्या आहेत. त्यामुळे हजारो रहिवाशांवर बेघर होण्याची वेळ येण्याची शक्यता आहे. याच ४१ इमारतीतील रहिवाशांनी आगरी सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष कैलास पाटील यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी मनपावर मोर्चा काढला.
- आमची फसवणूक बिल्डरने केली आहे, त्याच्यावर कारवाई करा आणि आम्हाला घराच्या बदल्यात घर द्या, अशी मागणी पालिका आयुक्तांकडे केली. यावेळी विरार पोलिसांनी पालिका मुख्यालयाबाहेर मोठ्या प्रमाणात बंदोबस्त ठेवला होता.

Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी पृ.पा.-७.

# नोकरीच्या प्रलोभनाने फसवणाऱ्या दांपत्याला अटक

## बोगस नियुक्ती पत्र देऊन आर्थिक फसवणूक




**। मीरा रोड** : भाईंदर पश्चिमेला राहणाऱ्या निक्की भोईर यांना मंत्रालयात लिपिक पदावर कामाला लावतो, असे सांगत नोकरीचे बनावट नियुक्ती पत्र देऊन आर्थिक फसवणुक करणाऱ्या दाम्पत्याला मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे.

मूर्धागाव येथील निक्की भोईर यांना मंत्रालयात लिपिक पदावर नोकरी लावतो असे सांगितले. त्यासाठी मंत्रालयात पैसे भरावे लागतील, असे खोटे सांगून आरोपी सागर चंद्रकांत कासारे व त्याची पत्नी (रा. मालाड, मुंबई) यांनी १ ऑगस्ट २०१८ ते १ जून २०२४ पर्यंत त्यांच्याकडून वेळोवेळी ४ लाख २० हजार रोख घेतले. त्यांनी नोकरीसाठी जास्त तगादा लावल्यानंतर त्यांना मंत्रालयात लिपिक पदावर नोकरीचे बनावट नियुक्ती पत्र देऊन आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी दाम्पत्याविरोधात भाईंदर पोलीस ठाण्यात १ सप्टेंबर २०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील पती-पत्नी सागर कासारे हे गुन्हा दाखल झाल्यापासून घर बदलून दुसरीकडे राहण्यास गेले होते. तेव्हापासून पोलिसांना मिळून येत नव्हते. कोणतीही माहिती नसताना पोउपनि हितेंद्र विचारे, व पोहवा संग्राम गायकवाड, पोशि. साकेत माघाडे यांनी याबाबत तपास केला. तेव्हा दाम्पत्य राजनपाडा, मालाड (मुंबई) येथे राहत असल्याचे समजले. सागर कासारे राहत्या घराजवळ येणार असल्याची माहिती मिळाली. त्यावेळी सापळा रचून त्याला ५ ऑक्टोबर रोजी दुपारी अटक केली. तसेच पत्नी सिनेमॅक्स, मीरा रोड येथे येणार असल्याचे कळल्यावर तिलाही मपोशि. चैताली सानप यांनी ताब्यात घेतले. पती-पत्नी पाहिजे आरोपी यांना पुढील कारवाईसाठी भाईंदर पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले आहे.

पुण्यनगरी पृ.पा.-८.

# वसईत कोट्यवधींचे अमली पदार्थ हस्तगत

**। वसई** : विरारमधील मनवेलपाडा, नालासोपारातील प्रगतीनगर, वसई पूर्व आणि नायगावातील अमोलनगर, परेरानगर अशा ठिकाणी छापे मारून, गस्त घालून पोलिसांमार्फत दर आठवड्याला कोट्यवधी रुपयांचे अमली पदार्थ हस्तगत करण्यात आले आहेत. गस्त घालत असताना नायगावच्या भदोरिया डॅम मुख्य रस्त्यावर रात्री अमली पदार्थ विरोधी कक्षाच्या पोलिसांनी हेरॉइन पकडण्यात आले. मोहम्मद मोनीस गौर संशयितरित्या वावरत होता. त्याची झडती घेतल्यावर १ कोटी ४२ लाख ८० हजार रुपये किमतीचा हेरॉईन हा अमली पदार्थ सापडला.

Scanned with OKEN Scanner

नवभारत पु.पा.3.

# वसई-विरार 12वीं मैराथन स्पर्धा 8 दिसंबर को

## बैटल रन फिर शुरू, पंजीकरण आरंभ, 17000 प्रतिभागी होंगे शामिल

■ **वसई** (सं). वसई विरार मनपा व वसई तालुका कला क्रीड़ा विकास मंडल के संयुक्त तत्वाधान में आयोजित राष्ट्रीय स्तर की 12वीं वसई-विरार मेयर मैराथन स्पर्धा का आयोजन 8 दिसंबर 2024 को होना है. इस मैराथन में 17 हजार से अधिक प्रतिभागियों के शामिल होने की संभावना है. मैराथन के लिए कुल 3 करोड़ रुपये का बजट बनाया गया है. मैराथन में 58 लाख रुपए की पुरस्कार राशि सभी वर्ग के विजेताओं में वितरित की जाएगी. उक्त बातें विरार पश्चिम स्थित वीवीसीएमसी सभागार में आयोजित पत्रकार वार्ता के दौरान मनपा आयुक्त अनिल कुमार पवार ने बताई. इस दौरान खेल विभाग के अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, मैराथन के मुख्य समन्वयक प्रकाश वनमाली, संदेश जाधव, आयोजन समिति और प्रायोजकों के प्रतिनिधि उपस्थित थे. साथ ही बताया कि, बुजुर्गों और वरिष्ठ नागरिकों को दौड़ के माध्यम से स्वस्थ रहने और प्रोत्साहित करने के प्रयास में आयुक्त ने तीन नए आयुवर्ग को जोड़ने की घोषणा की है.




### ओलम्पिक विजेता स्वप्निल कसारा हो सकते हैं शामिल

महिलाओं की फूल मैराथन में 55 वर्ष और इससे अधिक आयु वर्ग के लोग शामिल होंगे. जबकि 10 और 5 किमी. इवेंट क्रमशः 60 और उससे अधिक आयु के पुरुषों और महिलाओं के लिए बनाये गए हैं. इस बार की स्पर्धा समाज में महिलाओं का सम्मान बढ़ाने के लिए कन्या भ्रूण हत्या रोकें, प्रकृति का संतुलन बनाये रखें जैसे स्लोगन के साथ शुरू किया जाएगा.12वें संस्करण शामिल प्रतिभागियों के उत्साह वर्धन के लिए फिलहाल ओलम्पिक विजेता स्वप्निल कसारा संपर्क में हैं. उन्होंने कहा कि, बैटल रन बंद किया गया था, जिसे फिर से शुरू किया गया है. वसई विरार मनपा मैराथन इस पहल का एकमात्र आयोजक है, जो केवल रनिंग क्लबों के लिए एक विशेष स्पर्धा आयोजित करता है. बैटल रन में सर्वश्रेष्ठ 5 टीमों को 3 लाख रुपये की पुरस्कार राशि दी जाएगी. बैटल रन के लिए हाफ मैराथन में 4 सदस्यों की टीम भाग ले सकती है. इसमें एक महिला और एक 25 वर्ष से कम उम्र का धावक शामिल होगा. इसका समय 1.35 घंटे और 1.45 घंटे से कम है. चार सदस्यों का अंतिम समय विजेता का निर्धारण करेगा. सर्वश्रेष्ठ टीम को 90 हजार उसके बाद क्रमशः 60 हजार रुपये, 45 और 35 हजार रुपये का पुरस्कार दिया जाएगा.

## नौकरी के नाम पर 4 लाख की ठगी

■ **निसं, मीरा-भाईंदरः** मंत्रालय में नौकरी दिलाने के नाम पर 4.20 लाख की ठगी का मामला सामने आया है। पुलिस ने आरोपी पति-पत्नी सागर कासारे-प्रीति कासारे को गिरफ्तार कर लिया है। पीड़ित और आरोपी एक-दूसरे के परिचित थे। सागर ने कहा कि उसकी पत्नी मंत्रालय में है और नौकरी दिला सकती है। सागर ने 7 लाख रुपये मांगे थे। 4.20 लाख रुपये लेकर पीड़ित को फर्जी नियुक्ति पत्र भी दिया था।

## हरियाणा की जीत पर मीरा-भाईंदर में जश्न

■ **निसं, मीरा-भाईंदरः** हरियाणा में बीजेपी की जीत पर मीरा-भाईंदर इकाई ने जश्न मनाया। पार्टी इकाई ने ढोल-नगाड़े के साथ फटाखे फोड़े। इस मौके पर जिलाध्यक्ष किशोर शर्मा ने कहा कि हरियाणा की जीत दर्शाती है कि जनता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी के साथ है। इस मौके पर महिला जिलाध्यक्ष अनीता पाटील, युवा मोर्चा महामंत्री रणवीर बाजपेई, विशाल पाटील सहित कई पूर्व जनप्रतिनिधि मौजूद थे।

## MBMC ने अवैध निर्माण पर चलाया हथौड़ा

■ **निसं, मीरा-भाईंदरः** भाईंदर (पश्चिम) स्थित भीमसेन जोशी अस्पताल के सामने के अवैध निर्माणों पर मनपा का हथौड़ा चला। अस्पताल के ठीक सामने चर्च की लगभग 13 गुंठे जमीन पर काफी वर्षों से अतिक्रमण करके अवैध गैराज और अन्य का निर्माण किया गया था। इस संबंध में कई बार शिकायत भी की गई थी। अवैध निर्माण के कारण रहिवासियों को लगातार परेशानी होती थी।

Scanned with OKEN Scanner

नवराष्ट्र

# भरोसा सेलचा तिसरा वर्धापन दिन

भाईंदर, (वा.) महिला, बालके व ज्येष्ठ नागरिक यांना एकाच छताखाली सर्व सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे तत्कालीन पोलीस आयुक्त सदानंद दाते यांनी १ ऑक्टोबर २०२१ रोजी आयुक्तालयाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधत भरोसा सेलची स्थापन केली होती. भरोसा सेलला शुक्रवारी तीन वर्षे पूर्ण झाली असून, त्या निमित्ताने तिसरा वर्धापन दिन साजरा करण्यात आला आहे.सन २०२१ पासून ते आतापर्यंत भरोसा सेलमध्ये एकूण २,२६६ तक्रार अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी १,३३७ अर्जामध्ये समझोता घडवून आणण्यात आला. म्हणजेच जवळपास ५९ टक्के अर्जामध्ये समझोता घडवून आणण्यात भरोसा सेलला यश आले. त्याचबरोबर परदेशात कौटुंबिक हिंसाचारास बळी पडलेल्या पीडित महिलेस तसेच कामानिमित्त परदेशात जाऊन अडकलेल्या एकूण सात लोकांना भारतीय दूतावासाच्या मदतीने भारतात सुखरूप परत आणण्यात भरोसा सेलला यश आले आहे. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी भरोसा सेल, भाईंदरचा तिसरा वर्धापन दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास गुन्हे शाखेचे पोलीस उपआयुक्त अविनाश अंबुरे व सहायक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

# नवराष्ट्र

# रेडिओ फ्रिक्वेन्सीचे कार्ड चोरणारी आंतरराष्ट्रीय टोळी अटक

मीरा रोड, (वा.) मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखा युनिट -३ ला मोठे यश मिळाले आहे. गेल्या काही महिन्यांपासून मोबाईल टॉवरमधून ५जी नेटवर्कसाठी वापरल्या जाणाऱ्या रेडिओ फ्रिक्वेन्सी उपकरणांची चोरी वाढली होती. या घटना गांभीर्याने लक्षात घेत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार गुन्हे शाखा युनिट-३ ला या प्रकरणाची चौकशी सोपवण्यात आली होती. २२ ऑगस्ट २०२४ रोजी नालासोपारा पूर्व येथील फेन ॲव्हेन्यू अपार्टमेंटसमोरील एअरटेल टॉवरमधून एक कार्ड चोरी झाले होते.



## हे आमच्यासाठी एक मोठे यश आहे : मधुकर पांडे

आयुक्त मधुकर पांडे म्हणाले, "हे आमच्यासाठी एक मोठे यश आहे. अशा प्रकारच्या संघटित चोरीच्या घटना आपल्या देशाच्या सुरक्षेला धोका निर्माण करू शकतात. तसेच महत्त्वाच्या नेटवर्क संरचनेचे नुकसान करू शकतात. आमच्या पथकाने वेगाने आणि कुशलतेने कारवाई केली आहे, ज्यामुळे भविष्यात अशा चोरीवर अंकुश ठेवता येईल."आरोपींकडून चौकशीत हे देखील समोर आले आहे की, गेल्या एका वर्षात मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि वसई-विरार-नालासोपारा परिसरातही या प्रकारच्या चोरीच्या घटना घडल्या होत्या.

## सात आरोपी पोलिसांच्या ताब्यात

आरोपी शैलेश यादव, सुमन यादव, कपूरचंद गुप्ता, कन्हैयालाल जैन यांना मुंबईतून, तर जाकिर मलिक आणि जैद मलिक यांना दिल्लीतील मुस्तफाबादमधून, आणि मोहम्मद जुनेद यांना गाझियाबाद, उत्तर प्रदेशातून अटक केली. आरोपींकडून एकूण ३६ आर आर युनिट, मोबाईल फोन, आणि चोरीसाठी वापरलेल्या मोटारसायकली जप्त करण्यात आल्या. जप्त केलेल्या मालाची एकूण किंमत सुमारे ४० लाख रुपये आहे. पोलिसांनी एका आंतरराष्ट्रीय टोळीचा पर्दाफाश केल्याचा दावा केला आहे. प्राथमिक चौकशीत असे समोर आले आहे की, आरोपी चोरी केलेल्या उपकरणांना हॉंगकॉंग आणि चीनला पाठवत होते. या उपकरणांचे सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर बदलून ते काळ्या बाजारात महागात विकले जात होते. चौकशीत हे देखील उघड झाले आहे

# मुंबई चौफेर

## चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी दोन तासांत गजाआड

भाईंदर - नवघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या दोन तासांमध्ये आरोपीला अटक करून गुन्ह्यातील ९,०७,०४० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात नवघर पोलिसांना यश आले आहे. या चोरीप्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात कलम ३०५ (ए) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. तक्रारदार राहत असलेल्या इंद्रलोक परिसरात घरातील पोटमाळ्याच्या सिलिंगवर ठेवलेले ९,०७,०४० रुपये किमतीचे सोने-चांदीचे दागिने व रोख रक्कम अज्ञात चोरट्याने चोरून नेली होती. पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत चहुबाजूंनी तपास करत काही वेळातच आरोपीला ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली. सदर आरोपीकडून संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.




Scanned with OKEN Scanner

**ELEVATED ROAD & TWIN TUNNEL | State makes submission in HC; court hearing petitions by L&T challenging tender process**

# State extends bid deadline for Thane projects worth ₹16,577cr

**Urvi Mahajani**
MUMBAI

The state government informed the Bombay High Court on Tuesday that it is extending by 60 days, the last date of submission of bids for the Thane elevated road and twin tunnel projects worth Rs16,577 crore. The statement was made while hearing petitions filed by L&T challenging the tender process of the two infrastructure projects contending that the October 7 deadline following what it claimed were last-minute significant technical changes to the tender clauses.


Representative pic

Extension: **60 days**

L&T challenges tender changes

Withdraws petitions

**Projects:** Thane elevated road and twin tunnel

Cost: **₹16,577 cr**

Court highlights importance of geo-technical reports

Senior advocate Birendra Saraf, appearing for the Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA), on instructions, informed a bench of chief justice DK Upadhyaya and justice Amit Borkar that the authority shall extend the last date of submission of bids by 60 days from Tuesday (October 8), during which period petitioner (L&T) may submit its revised bid after carrying out geo-technical investigation survey in its own. Saraf clarified that even other bidders could submit their revised bids.

L&T had filed two petitions questioning the last minute changes to the tender process for infrastructure projects. One project links Thane and Mira Bhayander through a tunnel from Gaimukh to Fountain Hotel junction at Shilphata. The other project is an elevated creek road bridge connecting Bhayander to Ghodbunder Road in Thane, this will be second longest after the Mumbai Trans Harbour Link, also known as Atal Setu.

After Saraf's statement, L&T withdrew its petitions. During the hearing, the court had remarked that the geo-technical investigation report was essential considering the nature of the project. The judges highlighted that the construction of the bridge was not like that of an ordinary bridge over a river. The petitions were mentioned for urgent hearing on Monday and sought interim stay on opening of technical bids. Saraf had made a statement that it would not open the technical bids till Tuesday evening. The HC heard the petitions at length on Tuesday.

The infrastructure giant had contended that the notice inviting tender (NIT) of MMRDA did not contain the geotechnical data for the bridge and the bidders were burdened to collect the said data through an amendment, merely two days before the deadline to submit the tender on October 3, which was later extended to October 7. The firm, a top infra company, claimed it would require 30 days to collect the data.

Scanned with OKEN Scanner

THE FREE PRESS JOURNAL e-Paper

Thursday, OCTOBER 09, 2024, 11.30 AM

# Mira Bhayandar: MBVV Police Recover ₹35 Lakh Lost In Online Fraud, Warn Against Scams.

The Kashigaon police and their cyber cell counterparts managed to make collective reversals amounting Rs. 35 lakh which three people had lost in online frauds.




**Mira Bhayandar:** The Kashigaon police and their cyber cell counterparts managed to make collective reversals amounting Rs. 35 lakh which three people had lost in online frauds.

In the first case, the Kashigaon police received a complaint from Kashimira resident-Balwantrai Suri (60) stating that he lost more than Rs 18 lakh in a work from home scam which envisaged tasks including like posting likes, reviews on YouTube videos and online rating to hotels/movies.

The other two complaints were registered with the cyber cell unit attached to the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police by Parag Sanghvi (46) and a person identified as Dalvi who had fallen prey to the evil designs of cyber criminals who lured them into investing more than Rs 1.23 crore and Rs 35.55 lakh respectively on fake stock trading platforms.

After receiving the complaints, the Kashigaon police and cyber cell personnel started investigations and identified the bank accounts in which the ill-gotten wealth had been parked.

After continuous follow-ups with the concerned banks, Kashigaon police managed to freeze Rs 4.40 lakh out of the Rs 18 lakh. On the other hand, the cyber cell transferred Rs 21.93 lakh out of the Rs 1.23 crore and Rs 8.30 lakh out of the Rs 35.55 lakh to the bank accounts of Sanghvi and Dalvi respectively.

All the reversals were made following orders from the Judicial Magistrate First Class (JMFC), Thane. Meanwhile an offence under the relevant sections of the IPC and Information Technology Act has been registered at the concerned police stations. Further investigations were underway.

----000----

Scanned with OKEN Scanner

THE FREE PRESS JOURNAL
e-Paper

Thursday, OCTOBER 09, 2024, 11.30 AM

# Mira Bhayandar: Fraudster Couple Who Duped Job Aspirant Of ₹4.20 Lakh By Promising Clerk's Job In Mantralaya Nabbed After 4-Month Manhunt.

Boasting about their influential contacts with highly-placed government officials, the couple lured Bhoir by promising him a clerical job in Mantralaya. The couple not only took cash amounting to Rs 4.20 lakh from the complainant on various occasions between June and September this year but also gave him an appointment letter.ssss



**Mira Bhayandar:** Nearly four months after they duped an aspirant to the tune of more than Rs 4.20 lakh by promising a permanent clerk's job in Mantralaya, the couple finally landed into the custody of the central crime unit (CCU) attached to the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police on Sunday.

According to the police, the accused who has been identified as Sagar Chandrakant Kasare (47) and his wife came into contact with the job aspirant -Nikki Dinanath Bhoir- a resident of Murdha village near Bhayandar in June this year. Boasting about their influential contacts with highly-placed government officials, the couple lured Bhoir by promising him a clerical job in Mantralaya. The couple not only took cash amounting to Rs 4.20 lakh from the complainant on various occasions between June and September this year but also gave him an appointment letter.

----000----

Scanned with OKEN Scanner